महिला मार्गदर्शन केंद्र

सख्य

हिंसा थांबवा

# सख्य महिला मार्गदर्शन केंद्र

स्त्री सबलीकरणातून स्त्रीपुरूष समानता

# हुंकार

वर्ष : ८वे  अंक : २५ वा  डिसेंबर २०१९


## या अंकात....


* महिला व आर्थिक सबलीकरण
* महिलांचे आर्थिक सबलीकरण
* स्त्री आणि आर्थिक सक्षमीकरण
* महिलांचे आर्थिक नियोजन व साक्षरता
* महिलांचे आर्थिक सबलीकरण
* Women's Economic Empowerment
* "घुटन"
* महिलांच्या आर्थिक विकासाची वाटचाल आणि आव्हाने
* त्रैमासिक अहवाल



* प्रकाशक
शैला क्रास्टो

* संपादिका
मेरी वनमाळी

* सख्य परिवार *
शैला क्रास्टो
नॅटी लोपीस
मेरी वनमाळी
शालीनी जाधव
विद्या पाटील
क्लेरा घोन्सालविस
निता चव्हाण
अरुणा सावंत
डेलिना लोपीस
पार्वती दादोडा


प्रकाशकीय

## महिला व आर्थिक सबलीकरण

स्त्री आणि आर्थिक सबलीकरणाच्या दृष्टीने एखादा व्यवसाय करणे हे कधीच शक्य होणार नाही, असं चित्र १९व्या शतकापर्यंत होतं. स्त्रीचे क्षेत्र चूल आणि मूल एवढेच होते. स्त्रीने माजघराबाहेर पाऊलच टाकायचे नाही तर व्यवसायाचा संबंध येतोच कशाला? मुळात पुरुषाचा व्यवसाय शेती व व्यापार असायचा. शेतीची आणि घरातील कामे घरात राहूनच स्त्रिया करायच्या. घरातील कामे स्त्रियांची व घराबाहेरची कामे पुरुषांची, असा जणू नियमच होता. परंतु १९व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रियांना कामाची गरज वाटू लागली. आपणही काहीतरी केले पाहिजे, असे त्यांना वाटू लागले. समाजसुधारकांमार्फत स्त्रियांच्या उन्नतीकरीता कार्य होऊ लागले. स्त्रियांना जसजसे शिक्षण मिळू लागले तशा त्या नोकरी करण्याचा विचार करू लागल्या आणि हळूहळू आर्थिक सबलीकरणाला सुरूवात झाली. आज स्त्री अर्थव्यवस्थेतील महत्त्वाची व्यक्ती म्हणून ओळखली जाते. Information and technology सारख्या महत्त्वाच्या ठिकाणी स्त्री उत्कृष्टरित्या कार्यरत आहे. घरातील काम उरकून ती कमावत-देखील आहे. ही झाली एक बाजू, पण ज्या स्त्रिया घरकाम करतात. बऱ्याच वेळा त्यांच्या विषयी काय, श्रमाची नोंद घेतली जात नाही आणि स्त्रिया हे अगदी सहजपणे सांगत असतात, मी तर घरीच असते. घरात संपूर्ण दिवस तू राबत असते. सर्वांची तू काळजी वाहत असते म्हणूनच इतर व्यक्ती बाहेर जाऊन कमावू शकतात आणि त्यात तुझा सिंहाचा वाटा आहे, हे विसरून चालणार नाही.



दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपूर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने आणि कोमलतेने त्या निभावत असतात, असे असले तरी जगाच्या पाठीवर बऱ्याच ठिकाणी समाजाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसते, तसेच महिला मोठ्या


सख्य कार्यालय : सिल्वेस्टर स्मृती, पहिला मजला, पोलीस चौकीच्यासमोर, कळंब रोड, निर्मळ नाका, नालासोपारा (प), ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१३०४ वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.००

मोबाईल - 9890312402, Email Id - sakhya_87@rediffimail.com.

Website : www.sakhyawgc.org, facebook : Sakhyawomen'sGuidance Cell

'सख्य' ठाणे विस्तारीत शाखा : सिव्हील हॉस्पिटल, ओपीडीच्या समोर, तळमजला, टेंभी नाका, अग्यारी लेन, ठाणे (प.)

वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजता. मोबाईल : 9224642560

प्रमाणात सामाजिक असमानता, अत्याचार, आर्थिक परावलंबित्व आणि अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडतात. अनादी काळापासून महिलांवरील ही बंधने त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाच्या आड येत आहेत.

सामाजिक असमानता, कौटुंबिक हिंसा, अत्याचार आणि आर्थिक परावलंबित्व यातून स्त्रियांची सुटका व्हायची असेल तर गरज आहे महिला सक्षमीकरणाची, महिला सबलीकरणाची व महिला सशक्तीकरणाची. सक्षमीकरण म्हणजे खरंच नेमके काय ? शिक्षण मिळणे, बचतगट असणे आणि आर्थिक सुबत्ता मिळवून घरची आर्थिक स्थिती सुधारणे यावरच अनेकांची व्याख्या मर्यादित राहत असते. पण खरोखर तसं नाही. महिला सबलीकरण आपण नेहमी ऐकत असतो. त्याचा व्यापक अर्थ आहे. एखादी स्त्री कमावते ह्याचा अर्थ ती सक्षम आहे का ? महिला सबलीकरण आपण केव्हा म्हणू शकतो जेव्हा त्या स्त्रीला समान हक्क आहेत, तिला पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा मिळतो. निर्णय प्रक्रियेत तिला सामावून घेतो, तिच्या स्वत:चा विकास होतो ह्या सर्व गोष्टीकडे लक्ष दिले जाते तेव्हा आपण म्हणू शकतो की महिला सबलीकरण झाले आहे. पण प्रश्न येतो मोबदल्याचा पुरुषाच्या बरोबरीने किंबहूना पुरुषापेक्षा जास्त काम करणाऱ्या स्त्रियांना वेतन मात्र कमी दिले जाते.

एखाद्या कमावत्या स्त्रीला तिच्या पगारातून काही खर्च करायचा आहे पण हा निर्णय जर ती घेऊ शकत नसेल तर आपण ह्याला आर्थिक सबलीकरण म्हणू शकतो का ? आपण म्हणतो ती स्वतंत्र नाही पण स्वातंत्र्य दिले जात नसेल तर ते घ्यायचे कसे ? आपण समाज्याचा अविभाज्य भाग आहोत आणि निर्णय घेणे आपला हक्क आहे, आपण कशाप्रकारे निर्णय घेतो त्यावरून आपलं सबलीकरण दिसून येते.

ग्रामीण भागात स्त्रिया शेतीकाम करून, मजूरी करून स्वत:चा आणि कुटुंबाचा आर्थिक भार उचलत असतात वेगवेगळ्या संस्था बचत गटाच्या माध्यमातून व सरकारी योजनेतून महिलांना आर्थिक पाठबळ देत असतात. आज महिला लघूउद्योग करून स्वत:चा आणि कुटुंबाचा विकास करत आहेत आणि सबलीकरणाकडे वाटचाल करत आहेत.

आज स्त्रीला आर्थिक स्वावलंबन आहे पण स्वातंत्र्य नाही. ती नोकरी करते म्हणून घरातील तिची जबाबदारी कमी झाली नाही, उलट घर आणि नोकरी दोन्ही सांभाळावे लागल्याने तिला तारेवरची कसरत करावी लागते. अर्थात आजची स्त्री ही कसरत करण्यात यशस्वी झाली आहे यात शंका नाही.

आजची स्त्री फारच मुक्त झाली फार प्रगत झाली आहे. त्यामुळे कुटुंबसंस्था, समाज संस्था बिघडेल असे काही लोकांना वाटते. ते निरर्थक आहे. उलट शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. त्या महत्त्वाकांक्षी बनल्या आहेत. अनेक मानसिक ताणांना तोंड देऊन त्या स्वत:ची प्रगती करत आहेत. यशाच्या दिशेने वाटचाल करत आहेत. तरीही काही प्रमाणात आजही स्त्रियांमध्ये आर्थिक स्वावलंबन आलेले दिसत नाही म्हणून आमच्या ह्या अंकामध्ये स्त्रियांनी कशाप्रकारे आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करावी याविषयी विचारमंथन करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

**सि. शैला क्रास्टो**
**संचालिका, सख्य**



# महिलांचे आर्थिक सबलीकरण

राम हताश मुद्रेने घरात शिरला. मुलं फटाके द्या, कपडे द्या म्हणत त्याच्या पायाला बिलगली. रामच्या डोळ्यांत अश्रू आले, आपली पत्नी छायाकडे हताशपणे पाहत तो म्हणाला 'साहेबांनी बोनस नाही मिळणार असे सांगितले, आता कशी दिवाळी साजरी करायची.' क्षणभर थांबून छाया बोलली "थांबा, जरा, मी पाहते माझ्याकडे काही पैसे आहेत का ?" 'असे' म्हणून छायाने कपाटातील कपड्याच्या घड्या उलगडून शोधाशोध सुरू केली, त्यातून दहा, पन्नास, शंभरच्या एक एक करून अनेक नोटा जमत गेल्या आणि एकंदरीत पाच हजार रुपये मिळाले. राम मोठे डोळे करून पाहतच राहिला. तोपर्यंत छायाने किचनमध्ये वेगवेगळे डब्ब्यात शोधाशोध करून तीन हजार रुपये पुढे केले. तद्नंतर ती देवाच्या देव्हाऱ्याकडे वळली आणि तिथून एक हजार रुपये काढून दिले. क्षणभर ह्या लपवेगिरीचा रामला राग आला पण ऐन संकटात दिवाळी छायाने गोड केली त्यामुळे तो आत खुश झाला आणि बोलला 'बचत करण्यात तुम्हा बायकांचा हात कोण धरणार नाही.'

होय, हे खरं आहे की स्त्रिया बचत करु शकतात, फार पूर्वीपासून आजीबाईचा बटवा किंवा आईच्या पदराच्या गाठीत थोडाफार धनसंचय असायचा, जो त्या आपल्या प्रिय माणसाला अडचणीच्या वेळी द्यायचा, अशाप्रकारे स्त्रिया आपली जमापुंजी साठवून असल्याचे दिसून येते. बचत करण्यासाठी सवय स्त्रियांना असली तरी पैसे गुंतवणे, व्यापारात वापरणे, पैसे वाढवणे, मोठा आर्थिक निर्णय घेणे अशा आर्थिक व्यवहारात त्या नेहमी मागे पडत असतात. आपल्याला बँकेचे व्यवहार जमत नाही, पैशांचे सर्व व्यवहार आपले पती पाहतात हे त्या मोठ्या कौतुकाने सांगत असतात. आर्थिक व्यवहारातील मोठे निर्णय घेण्यास त्या धजत नाहीत त्यामुळे उद्योग, धंदा, व्यापार या ठिकाणी स्त्रियांचे प्रमाण आज कमी दिसत आहे. आर्थिक व्यवहाराचे अंदाज, गुंतवणूक, शेअर बाजार इत्यादी बाबी या स्त्रियांच्या आवाक्यातील नाही असा सर्वत्र समज आहे.

आजच्या आधुनिक युगात पैसा, अर्थ ह्याशिवाय दैनंदिन जीवनातील पानही हलत नाही आणि विकास तर शक्यच नाही. ज्याच्या जवळ पैसा तोच पुढे पुढे जाऊन विकास साधतो व सामर्थ्यवान, सत्ताधीश बनतो. आज महिलांचे आर्थिक सबलीकरण ही काळाची एक महत्त्वाची गरज असून, त्या दिशेने संपुर्ण जगभरात पाऊले उचलली जात आहेत. महिलांचे



आर्थिक सबलीकरण म्हणजे स्त्रियांना शक्ती देऊन, त्याद्वारे त्यांची इतरांवर सत्ता वाढविणे किंवा इतरांवर त्यांचे वर्चस्व, श्रेष्ठत्व निर्माण करणे नव्हे, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. महिलांचे आर्थिक सबलीकरण हे स्त्रियांना सर्वांगाने सबल करणारे, सशक्त करणारे, सक्षम करणारे असावे, त्यांना पुरुषांपेक्षा सत्तावान, शोषणाभिमुख, उन्मत्त करणारे नसावे. प्रत्येक समाजात शक्तिशाली व शक्तिहीन समुह असतात. परंतु कल्पना व प्राप्त संसाधनाने योग्य त्या दिशेने समायोजन करणे म्हणजे सबलीकरण होय. महिलांचे आर्थिक सबलीकरणाचा अर्थ, स्त्री ही आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र, स्वयंनिर्भर व स्वावलंबी असणे होय. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिला तुलनात्मकतेने शक्तिहीन असतात, कारण त्यांच्यात संसाधनांना समायोजित करण्याची क्षमता नसते, त्यामुळे त्या लगेच निर्णय घेऊ शकत नाहीत. असमानतेचा आधार हा केवळ आर्थिक व्यवस्था आहे. याचाच अर्थ असा होतो की, ज्या ठिकाणी महिला पुरुषांच्या बरोबर वा त्यांच्यापेक्षा आर्थिकदृष्ट्या अधिक मजबूत असतात. त्या ठिकाणी स्त्रियांचा दर्जा हा पुरुषांच्या बरोबरीने असतो. महिलांच्या सबलीकरणाचीच कास धरतो. महिला सबलीकरणामुळे पुरुषांवरील आर्थिक तणावसुद्धा काही प्रमाणात कमी होईल आणि त्यांचीही दमन व शोषणाच्या दुष्टचक्रातून सुटका होईल.

सबलीकरणासाठी अनेक बाह्य परिस्थितीजन्य प्रेरणा स्त्रोतांची जसे शासकीय योजना, कायदा, सामाजिक प्रेरणा आवश्यकता असतेच. महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी शासनाने विविध धोरणे वेळोवेळी अवलंबविली व राबविली. महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात कालसुसंगत बदल करत २००१ मध्ये दुसरे तर २०१४

मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसार माध्यमांची भूमिका, स्वंयसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वंयसाहाय्यता बचतगटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय-निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत ३० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थात ५० टक्के आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळांच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण-प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात.

कायद्याने समानतेच्या तत्त्वानुसार महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी स्त्रियांना मालमत्तेत हक्क देण्याची तरतूद करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर मालमत्तेची स्वत:च्या इच्छेप्रमाणे व्यवस्था करण्याचे व उपभोग घेण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना मिळाले आहे. वाडवडिलोपार्जित मालमत्तेवरचा हक्क हा स्त्रीचा वैयक्तिक आणि अबाधित हक्क असल्याचे कायद्याने मान्य केले आहे. ती नोकरी करते, शिकलेली आहे, तिला पैशाची गरज नाही, तिच्या लग्नावर खर्च केला आहे, जे द्यायचे ते तिला देऊन झाले आहे हे विचार कायद्याच्या नजरेत पूर्णपणे गौण आहेत. मालमत्तेवरील स्त्रीचा समान हक्क तिला मिळावा हे कायद्यात ठामपणे प्रतिपादन केलेले आहे. ह्या कायद्याद्वारे आज समाजात स्त्रिया आपला रास्त व न्याय हक्क मिळवीत आहेत.

कामकरी महिलांना समान कामासाठी समान वेतन मिळण्याचा हक्क आहे. असे असले तरी काही ठिकाणी स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जात आहे. कायदा अस्तित्वात असताना उघड उघड भेदभाव करता येणार नाही हे काही प्रमाणात आपण मान्य केले आहे. पण प्रत्यक्षातला अनुभव वेगळा आहे. छोट्या-छोट्या फॅक्टरींमध्ये कर्मचाऱ्यांना देण्याच्या सोयी-सवलतींवरील खर्च वाचविण्यासाठी स्त्री कर्मचारी रेकॉर्डवर दाखविल्या जात नाहीत मात्र प्रत्यक्षात अनेक स्त्री कर्मचाऱ्यांना बेकायदेशीरपणे राबवून घेतले जाते. अल्प मोबदल्यात महिलांकडून कामे करून घेऊन त्यांची पिळवणूक केली जात आहे. स्त्रिया व पुरूष यांच्यामध्ये वेतन देताना भेदभाव केला जात आहे. असंघटित क्षेत्रांमधील महिला कामगारांची किमान वेतनापेक्षा कमी वेतन देऊन आर्थिक व शारीरिक पिळवणूक केली जात आहे. असंघटीत क्षेत्रांमधील महिला कामागारांची किमान वेतनापेक्षा कमी वेतन देऊन आर्थिक व शारीरिक पिळवणूक केली जात आहे.

भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरकामात असतात तर काही वेळा कामाच्या ठिकाणी कमी उत्पादकेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते, म्हणून महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय, इ. क्षेत्रात काम करत असतात परंतु त्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही. त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही. जेथे स्त्रियांच्या अधिकाराचा व्यक्तीश: संबंध येतो, पुनरुत्पादनाच्या अधिकाराचा संबंध येतो ह्या अधिकाराचा मुक्त वापर करता आला पाहिजे. कुटुंब व समाजाप्रतीचे कार्य व जबाबदारी ती स्वीकारते. लैगिंक व सामाजिक शोषणाची भीती तिला नसते. तसेच त्यांच्या घरातील हक्क व मुलांबाबतच्या पालकत्वाचा अधिकार त्यांना प्राप्त होतो. अशा सर्व परिस्थितीत महिलांचे आर्थिक सबलीकरण होते. यासाठी स्त्रीला तिने केलेल्या उत्पादक कार्यातून प्राप्त होणाऱ्या उत्पादनांचा फायदा मिळावा व तिने कुटुंबाकरिता केलेल्या कार्याची दखल घेऊन त्या कार्याला महत्त्व दिले जावे. थोडक्यात कार्याकडेही सन्मानाने पाहिले जावे.

आज कामकाजी, व्यवसायी, नोकरदारी महिलांशी चर्चा केली असता त्यादेखील स्वत:ला सक्षम मानत नाहीत. त्यांच्या दृष्टीने महिलांचे आर्थिक सबलीकरण म्हणजे फक्त कार्यक्रम, व्याख्यान आहे; पण तसे न होता वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे आज गरजेचे आहे. ज्या संसाधनांच्या वापरांमुळे सबलीकरण प्रभावीपणे केले जाऊ शकते ती संसाधने म्हणजे आर्थिक संसाधने होय. अशी आर्थिक संसाधने आणि धन महिलांजवळ पोहोचायला हवीत तसेच त्यांच्या कमाईचा वापर करावा ह्याचा अधिकार त्यांना असला पाहिजे. महिला या देशात भविष्य ठरवणारी शक्ती आहे आणि त्यामुळे ही शक्ती सुदृढ व सक्षम बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. सबलीकरणाची प्रक्रिया ही बुद्धि आणि जाणीव यांपासून सुरु होते. जेव्हा स्त्री स्वत:वर आपल्या अधिकारांवर, आपल्या योग्यतेवर विश्वास करेल, तेव्हाच तिच्या मनात लहानपणापासून घर करून बसलेली दुर्बलता, सहनशीलता, कमकुवतपणा काही प्रमाणात का होईना ती नष्ट करू शकेल.

**डॉ. नेन्सी डिमेलो**

# स्त्री आणि आर्थिक सक्षमीकरण

आपल्या देशात स्त्री म्हणून जन्माला येणे आणि माणूस म्हणून जगणे हे तसे आव्हानास्पदच असते. स्त्रीचा संघर्ष अगदी जन्माला येण्यापासूनच असतो कारण गर्भाशयातच भ्रूणहत्या होण्याची शक्यता असते. यात घर गरीबाचे की श्रीमंताचे हा भेदभाव नसतो कारण सगळ्यांना वंशाचा दिवा वगैरे म्हणून मुलगाच हवा असतो. लहानपणापासून वाढताना ''परघरचे धन'' वगैरे समजून मुलावर सगळा भर व मुलीवर दुर्लक्ष होताना दिसते. मुलींचे यात शारीरिक बौद्धीक व मानसिकही कुपोषणही घडते. मुलीऐवजी मुलांचे पालनपोषण, शिक्षण अधिक कसोशीने केले जाते. भावंडांची देखभाल करण्यासाठी मुलींची शाळा बंद केली जाते, यात नव्याने सांगण्यासारखे काही नाही. मात्र सर्वत्र परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलते आहे हेही खरे आहे. तरीही मुलींना ''सातच्या आत घरात, जीन्सची पॅट घातली म्हणून ॲसीड टाकले'' अशा दु:खद सामाजिक स्थितीत कन्या, बालिका, कुमारिका, नववधू ते माता या स्त्रीच्या सगळ्या टप्प्यात तिची जडणघडण दुसऱ्यांद्वारेच अधिक होते. स्वत:च्या आयुष्याविषयीचे तिचे निर्णय तिला घेता येत नाहीत. स्त्री घडत नाही; घडविली जाते. तीही सोय व गरज लक्षात घेऊन यातून होते एकच - ती परावलंबी राहाते. भारतात स्त्री म्हणून असणे, त्यात गरीब स्त्री असणे म्हणजे दुर्दैवी व आव्हानास्पद असते. गरीब विधवा असणे तर अधिकच संकटकारक असते. ''पेजेला देईल तो शेजेला घेईल'' हे भयावह वास्तव आजही सर्वत्र आहेच. आर्थिकदृष्ट्या केवळ सक्षमच नव्हे तर स्वतंत्र असणे स्त्रीसाठी मोलाचे असतेच. नवऱ्यानंतर मुलांवरही अवलंबित्त्व असू नये. हुंडा हे खरेतर स्त्रीधन; मात्र त्यासाठीही तिचा क्रूरपणे छळ करून तिचा जीव घेतला जातो. ''सर्वस्व तुम्हाला वाहूनी, राबराब राबूनी, माझ्या घरी मीच पाहुणी'' असे वास्तव टाळण्यासाठी स्त्रीला स्वत:चे पैसे स्वत: कमाविता यायला हवेत व ते कमविल्यावर तिचे स्वत:चे राहायला हवेत. जी स्त्री स्वत:चे पैसे कमावित नाही ती खऱ्या अर्थाने स्वतंत्र असते असे म्हणता येणार नाही. स्त्रीचे कोणतेही अवलंबित्त्व स्त्रीला शोषणाकडे नेते हा सार्वकालिक, सार्वत्रिक अनुभव आहे. आजवर उंबऱ्याच्या आत कोंडून चिरडल्या गेलेल्या गतकालातील असंख्य ज्ञातअज्ञात स्त्रियांचे हुंकार आणि हुंदके आता काळाच्या पडद्याआड विरले व विसरले गेले असले तरीही तो



आपला दु:खद वारसा आहेच. स्त्रीमुक्ती वगैरे स्त्रियांवर उपकार करणे नसून प्रायश्चित्तच आहे. स्त्रीत्त्वाला दडपल्याबद्दलीची प्रायश्चित्ते घेण्याची क्षमता मानवजातीकडे खचीतच नाही एवढे स्त्रीत्त्वावरील अत्याचार मोठे आहेत. मानवी संस्कृतीचा मोठा इतिहास हा स्त्रीच्या शोषणाचा इतिहास आहे. स्त्रीच्या शोषणाला सांस्कृतीक संस्थात्मक व धार्मिक स्वरुप दिले गेले. आजची स्त्री मोठ्या आत्मविश्वासाने ''माय लाइफ, माय रूल्स'' म्हणत मोकळा श्वास घेत स्वत:चे आयुष्य जगायला धडपडत असताना स्त्रीच्या मुक्तीचा, स्वातंत्र्याचा आणि आत्मप्रतिष्ठा रक्षणाचा, स्त्रीपुरुष समानतेचा मार्ग स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्यातून जातो हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच 'स्त्री आणि तिची आर्थिक सक्षमता' हा विषय मोलाचा आहे.

स्वतंत्र, समता, बंधुता, व्यक्तीच्या जीवनाची प्रतिष्ठा, संधीची समानता, शोषणापासून व भेदभावांपासून मुक्ती अशा मूलभूत बाबींची हमी जरी राज्यघटनेने दिली असली तरीही स्त्रीक्षमतेची सुरूवात घरातूनच व्हायला हवी. त्यासाठी मानसिकतेत मोठा सकारात्मक, रचनात्मक बदल व्हायला हवा. राज्यघटना कायदे करू शकते पण घरातले बदल घरच्यांनीच करायचे असतात. स्त्रीला स्वयंपाकघरासाठी व आई होण्यासाठी नव्हे तर बदलत्या आर्थिक, सामाजिक व राजकीय बदलांच्या परिप्रेक्षात एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्यासाठी सक्षम, समर्थ करायचे आहे. अर्थव्यवस्थेतील बदलांचा स्त्रियांवर लक्षणीय परिणाम होत आहे. स्त्रियांचे एकूण रोजगारातील प्रमाण घसरत आहे. स्त्री करीत असलेले अर्ध्याहून अधिक काम हे विनावेतन असते, वा पुरुष करतात तेच काम केले तरीही स्त्रीला कमी वेतन दिले जाते, अनेक संधी नाकारल्या जातात. भारतात स्त्रिया मोठ्या प्रमाणात असंघटीत क्षेत्रात काम करीत असल्याने त्यांचे शोषण सहज साध्य होते. त्यात विविध क्षेत्रात स्त्रियांना प्रतिनिधित्त्व नसल्याने त्यांचा आवाज दडपलेलाच राहातो. कृषी क्षेत्रात ४० टक्क्याहून श्रमशक्ती स्त्रियांची असली तरीही ९ टक्क्यांहून कमी जमिनीची मालकी स्त्रियांकडे आहे. त्यामुळे मालकीचे उत्पादन वा मुल्यवर्धनाचे साधन नसल्याने अवलंबित्त्व वाढते. जवळपास

अर्ध्याहून अधिक स्त्रियांकडे बँक बचतखाते नाही, त्यांना वित्तीय व्यवस्थेत फार कमी स्थान आहे. तब्बल ९० टक्के स्त्रीयांच्या नावावर मालमत्ता नसते. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत स्त्रीयांचा वाटा जेमतेम १७ टक्क्यांच्या आसपासच आहे; मात्र जगभर हे प्रमाण ३७ टक्के आहे. पुरुषांच्या मानाने स्त्रीयांकडे मोबाईल फोन व इंटरनेट सुविधा नसल्याने ज्ञानमाहितीची विषमता येत आहे. कामकाजाच्या ठिकाणी होणारे लैंगिक व इतर छळ याचे प्रमाण मोठे आहे. राजधानी दिल्लीत तब्बल ९२ टक्के स्त्रीयांनी त्यांचा लैगिक छळा झाल्याचे म्हटले आहे. एखाद्या नोकरी करणाऱ्या स्त्रीवर अत्याचार झाला की अनेक घरातून मुलींना बाहेर पडून नोकरी करण्याला नकार दिला जातो आणि क्षमता व संधी असूनही घरातच अडकून पडावे लागते. राज्यस्थानमध्ये उच्चशिक्षण घेणाऱ्या व नोकरी व्यवसाय करणाऱ्या स्त्रीयांचे प्रमाण कमी आहे त्याची कारणे खूपशी सामाजिक आहेत.

स्त्रीयांसाठी असलेल्या विविध विकास योजनांची माहिती नसते. केंद्र सरकारची जनधन योजनेशी जोडलेली स्त्री सक्षमी करणाची मुद्रा योजना एक उदाहरण म्हणून घेता येईल, याघडीला या योजनेविषयी माहिती असल्याने या योजनेचा तब्बल ७८ टक्के वाटा स्त्रीयांचा आहे. शिक्षण आणि रोजगारसक्षम कौशल्यविकास, राज्यघटनेने दिलेले अधिकार व कायद्याचे संरक्षण, माहितीतंत्रशास्त्राचे प्रशिक्षण, विविध सरकारी योजना, अशासकिय संस्थांचे पाठबळ, बदलत्या अर्थव्यवस्थेतील आव्हाने व संधी याविषयी स्त्रीयांचे प्रबोधन व्हायला हवे. आजचा भारत हा शहरांकडे स्थलांतर करणाऱ्यांचा देश आहे कारण मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून लोक शहरी भागांकडे येत आहेत. शेतीसारखे पारंपारिक व्यवसाय नकोसे झाले आहेत, आधुनिक जिवनशैलीची ओढ आहे. शहरात शोषणाच्या शक्यता वाढतात व स्त्री शोषणाला लवकर बळी पडते. भारताने ''मिलेनियम डिव्हलपमेंट गोल्स'' चा स्विकार केला असून स्त्रीयांचे शोषण संपविण्याचा व त्यांना अर्थव्यवस्थेत मोठा वाटा देण्याचा निर्धार केला आहे. स्त्रियांचे रोजगारातील प्रमाण वाढल्यास त्यातून उत्पादकता वाढते असा अनुभव आहे. स्त्रिया वेगाने नवनवी ज्ञानकौशल्ये आत्मसात करून सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. हे चित्र आशादायक आहे. मात्र तळागाळात स्त्रीची दडपणूक, संधीची विषमता, बंधनांचे प्रमाण मोठे आहे. त्यासाठी स्त्रीयांसाठी राखीव संधी ठेवण्यांसारखा सकारात्मक हस्तक्षेप करायला हवा. स्त्री सक्षमता म्हणजेच स्त्रीचे शोषणाला कारणभूत होणारे अवलंबित्त कमी करणे. स्त्रिया एकत्र आल्यास व बचतगट, उद्योजकता विकास गट असे एकूण अर्थव्यवस्थेशी जोडणारे उपक्रम हाती घेतल्यास त्यातून संघटीत स्वरूपात वेगाने व व्यापक सक्षमीकरण होईल. यासाठी “स्किल इंडिया मिशन'' सारख्या योजनांचा लाभ घ्यायला हवा. संघटीत स्त्रीशक्तीचा वापर करून आयटी तंत्रज्ञानाच्या मदतीने स्वयंरोजगारावर भर द्यायला हवा. वाढत्या नागरिकरणामुळे स्त्रीयांसाठी स्वयंरोजगाराच्या व लघु ते मध्यम उद्योजकतेच्या अनेक संधी उपलब्ध होत आहे. संधीचे अवकाश विस्तारत असताना स्त्रियांनी आत्मविश्वास, ज्ञान व कौशल्याने सुसज्ज व्हायला हवे. विविध एनजीओजना काळाची भूमिका बजावीत येईल. ऑनलाइन व दूरस्थ शिक्षणातून स्त्रियांनी शिक्षण व सक्षमीकरण सुरू ठेवायला हवे. ‘स्मार्ट सीटीच्या भारतात स्त्री सुद्धा स्मार्ट असायला हवी. वसईतील ''सख्य'' संस्थेचे स्त्रीसक्षमीकरणाचे उपक्रम प्रेरणादायी आहेत.

जगभरातील १८७ देशांत स्त्री-पुरुष समानतेत भारताचा क्रमांक १२७ वा आहे नव्या मुक्त बाजाराधिष्ठित अर्थ व्यवस्थेत किमान पंचवीस कोटी लोक दारिद्र्यातून बाहेर पडले असले तरीही त्यातील स्त्रियांचे प्रमाण उत्साहवर्धक नाही. २००५ ते २०१२ दरम्यान दोन कोटींहून स्त्रियांचा रोजगार बुडाला. ही लोकसंख्या श्रीलंकेच्या लोकसंख्येएवढी आहे. श्रमशक्तीतील स्त्रियांचा वाटा विचारात घेतला तर १३१ देशात भारताचे स्थान १२१ वे आहे. स्त्रियांचा रोजगारातील वाटा वाढला तर अर्थव्यवस्थेला मोठी उभारी मिळेल हे स्पष्टच आहे. बाजाराधिष्ठित अर्थव्यवस्थेत स्त्री एक भोगवस्तू व्हायचा वास्तव धोका असतोच. डान्स बार हे अलिकडचे उदाहरण म्हणता येईल.

स्त्रियांचे सक्षमीकरण विचारात घेतानाच ‘सक्षम भारतातील स्त्री’ याचाही साक्षेप विचार व्हायला हवा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पददलितांना जो ''शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा'' क्रांतीकारी संदेश दिला तो आता समस्त स्त्रियांनी अंगिकारायला हवा व नव्या जगातील संधी साधून आत्मविकास करण्यासाठी स्वत:ला सक्षम करीत आर्थिक स्वातंत्र्य व सामर्थ्य मिळवीत समानतेची कास द्यायला हवी. समानता कधीच दिली जात नाही, मिळत नाही; ती संघर्षातूनच मिळवावी लागते. ''जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी'' हा विचार आता जुना झाला. ''जिच्या हाती आर्थिक दोरी ती स्वत:ला व मग जगाला उद्धारी'' हे आजचे सूत्र आहे. स्त्रियांच्या आर्थिक क्षमताविकासासाठी जाणिवपूर्वक विकास योजनांचे नियोजन करायला हवे ते यासाठीच.

एखाद्या संस्कृतीचे महानपण समजून घ्यायचे असेल तर त्यात स्त्रियांची स्थिती काय आहे हे पाहायला हवे. असे स्वामी विवेकानंदांनी जे म्हटले आहे ते खरोखरीच प्रत्ययकारी व आत्मपरीक्षणाकडे नेणारे आहे.

**प्रकाश आल्मेडा**

# महिलांचे आर्थिक नियोजन व साक्षरता



महिलांचे नाव जेव्हा प्रथम येते तेव्हा एक गोष्टी नेहमी लक्षात ठेवावी ती म्हणजे ज्या घरामध्ये महिलांचा आदर होतो तिथेच देवतांचा वास असतो. तिथेच माणूस आनंदी राहतो.

पूर्वी आपल्या बायका घर सांभाळत, शेतीवाडी करीत, बाजारहाट करून संसार चालवीत. त्यावेळी थोडीथोडी पैशाची बचत करत. ज्याला आपण 'बारोजी' म्हणत, ते पैसे साठवून अडीअडचणीच्या वेळी वापरत असत. शेती व्यतिरिक्त आपल्या घरी वर्तमानपत्रे येतात. त्याची रद्दी जमा करुन ठेवली व ती विकली तर त्या पैशातून नवीन वृत्तपत्राचा खर्च काढू शकता. सद्या आपल्याकडे गावठी कोबंडी किंवा त्यांची अंडी फार दुर्मिळ झालेली आहेत. कुक्कटपालन करुन उत्पन्न मिळवू शकता. टेलरींग काम करू शकता, विरारचे प्रसिद्ध स्त्री रोगतज्ञ डॉ. देसाई स्वत: शिलाई काम करतात, स्वत:चे फार्म हाऊस चालवतात. ज्याद्वारे ते बचत करतात. सद्या मोठ्या प्रमाणात महिला नोकरी करतात. ४-५ घरगुती गृहिणी एकत्र येऊन खाद्यपदार्थ बनवून विकले तर नफा मिळून घरगुती पैसे कमवू शकता. तसेच पाळणाघर चालवून चांगली कमाई करू शकता. अशाप्रकारे लहान लहान घरगुती उद्योग करून पैसे मिळविण्यासाठी प्रयोजन महिला करु शकतात.

नियोजन दोन प्रकारचे असते एक आर्थिक नियोजन व दुसरे मानसिक नियोजन. काटकसर करून बचत करण्यासाठी प्रथम तुमची मानसिक तयारी झाली पाहिजे. त्यासाठी मानसिक नियोजन महत्त्वाचे आहे. नाहीतर आला पैसा केला खर्च. पूर्वी आपल्याकडे बँका नव्हत्या, पतपेढ्या नव्हत्या. अशावेळी पैसा घरातच साठवला जाई किंवा सोन्याचे दागिने बनविले जात.

आता परिस्थिती बदलली आहे. आपल्या परिसरात पतपेढ्या व बँकेच्या माध्यमातून बऱ्याच प्रमाणात पैसा कपाटात साड्यांच्या घडीमध्ये आढळला. इथे गृहिणीला विनंती करते की, तुम्ही घरात न ठेवता आपल्या सुनेला किंवा मुलीला विश्वासात घेऊन आपल्याकडे असलेले पैसे पतपेढीत किंवा बँकेत गुंतवा.

व्यवसाय करणारी, नोकरी करणारी किंवा घर सांभाळणारी गृहिणी असो ह्या सर्वांचा विचार केला तर सर्वांनाच आता बचतीची गरज आहे. पैसा चंचल असतो, तो एका जागी टिकून राहत नाही. तो सांभाळून ठेवावा लागतो. त्यासाठी काटकसर करून बचत केली तर अडचणीच्या वेळी तो कामाला येतो. पूर्वीच्या गृहिणी काटकसर करून ठेवलेल्या पैशातून शेती व्यवसायासाठी पैसा बाजूला काढून ठेवत. त्याच पैशातून पुन्हा शेती व्यवसायासाठी बी-बियाणे आणून शेती करून, कमाई करीत, तसेच पैसे साठवून मे महिन्यात पावसाळ्याची पुन्हा बेगमी करीत असत ज्या गृहिणी बेगमी करीत त्यांना संकटकाळी काहीच धावपळ करावी लागत नसे. पूर्वीच्या गृहिणींना पैशासाठी घरातील कर्त्या पुरुषावर अवलंबून रहावे लागत असे. आता नोकरीवाल्या महिला दरमहा नियमित पगार मिळत असल्यामुळे त्यांना काटकसरीची गरज लागत नाही. त्यांना नवऱ्यांसमोर हात पसरावा लागत नाही. घरातल्या पुरुष मंडळीप्रमाणे खर्च करायला घाबरत नाहीत. पूर्वी मुलांना पैसे हवे असतील तर आई बाबाकडे पाठवीत असे, परंतु आता आई-वडिल दोघेही कमवत असल्यामुळे मुलांना कुठल्याही गोष्टीची कमतरता भासू देत नाही. आपल्या युवा पिढीना बचतीचे महत्त्व कळत नाही. त्यामुळे सुशिक्षित असून गुतंवणूकीच्या व बचतीच्या बाबतीत आजची युवा पिढी अशिक्षित राहिली आहे. दरमहा नियमित पगार मिळतो म्हणून नको त्या गोष्टीची खरेदी करतो.

डि मार्ट, अपना बाजार, बिग बाजार, ऑनलाईन खरेदी ही आजकालची फॅशनच झाली आहे. त्यामुळे जेथे पाचशे रुपयांची खरेदीची गरज आहे तिथे आपण पाच हजार रुपयांची खरेदी करतो व नको असलेल्या वस्तू घरात घेऊन येतो. इथे आपले आर्थिक नियोजन साफ चुकते. आवश्यक तेवढेच गरजेपूते लागणारी वस्तू

घेतली तर वस्तूची नासाडी होणार नाही व नाहक खर्च वाढणार नाही व बचत वाढली जाईल. सद्या परिस्थिती बदलली आहे. महागाई वाढली आहे. जगभरात आर्थिक मंदी आहे. ज्याची झळ आपल्यालादेखील पोहचली आहे. उदा. २० रु किलो असलेला कांदा आता आपल्या ८० रु किलो देऊन घ्यावा लागतो. किलोमागे रु ६० वाढले. उत्पन्न तितकेच राहिले आहे. उत्पन्नात वाढ झाली नाही म्हणजेच मंदी आली आहे. त्यामुळे भविष्यातील धोके ओळखून मुलांच्या शिक्षणासाठी, घर बांधण्यासाठी, औषधोपचारासाठी आता जर बचतीची सवय लागली तर भविष्यात आपल्याला आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागणार नाही. नव्याने कामाला लागलेल्या मुलींनी आर्थिक नियोजन करणे गरजेचे. या देशात जो स्वत: पैसे कमवू आणि राखू शकत नाही तो खऱ्या अर्थाने स्वतंत्र नाही. केवळ सुशिक्षित होणे पुरेसे नसून आर्थिक साक्षर होणे महत्त्वाचे आहे.

सद्या सरकारी नोकऱ्या फार कमी आहेत.सन २००५ पासून सरकारी पेन्शन योजना बंद झाली आहे. मोठ्या प्रमाणात पगार हातात येतो, तसाच संपवला जातो. भविष्याची चिंता म्हणून गुतंवणूक करा नाहीतर तुमच्या संसारात आर्थिक मंदी यायला वेळ लागणार नाही. पाश्चिमात्य देशात आर्थिक मंदीची झळ मोठ्या प्रमाणात पोहचली. सर्व जगात आपला भारत देश असा आहे जेथे बचतीची सवय असल्यामुळे आर्थिक मंदीची झळ एवढी पोहचली नाही.

नोकरी करणारे सेवानिवृत्त होतात. मोठी रक्कम येत ती सुरक्षितपणे गुंतवण्याची खरी गरज आहे. सेवानिवृत्तीचा पैसा आल्यानंतर तो मुलामध्ये वाटू नका. तुम्हाला पेन्शन नसेल तर तुमच्या नावावर मासिक योजनेत गुंतवा. त्याच्या व्याजातून तुमच्या औषधाचा खर्च निघू शकेल. तुम्हाला मुलांपुढे हात पसरावा लागणार नाही.

गृहिणीनी आताच पतपेढीच्या व बँकेच्या वेगवेगळ्या ठेव योजनेत पैसा गुतंवावा. भविष्यात पैसा असेल त्यालाच घरात किंमत असेल. पैसा नसेल तर कोण विचारणार नाही. आपण अखेरपर्यंत आत्मनिर्भर असलं पाहिजे.

आपल्याकडे लोकांना घरे बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही परंतु ज्यांनी ज्यांनी जमिनीमध्ये गुतंवणूक केली आहे त्यांना चांगल्याप्रकारे आर्थिक फायदा झालेला आहे. आपण आपल्या नालासोपारा स्टेशन नजीक असलेली जागा कवडीमोलाने विकली व त्याठिकाणी नवीन इमारती उभ्या राहिल्या. शहरीकरण झाले. परंतु त्याकाळी आपल्या लोकांनी त्या ठिकाणी फ्लॅट किंवा गाळे खरेदी केले नाही. परंतु ज्यांनी त्याठिकाणी गुंतवणूक केली त्यास चांगले उत्पन्न मिळाले. सद्या आर्थिक फसवणूक फार मोठ्या प्रमाणावर चालू आहे. गुतंवणूक करताना जिथे व्याजदर जास्त मिळतो. त्याठिकाणी गुतंवणूक करू नका. गुंतवणूक करताना कुठल्याही अमिषाला बळी पडू नका. आकर्षक व्याजदर देणाऱ्या योजनेत पैसा गुंतवू नका. आपल्या उत्तर वसईत घडलेला प्रकार आगाशी येथील परमार दुकानदार, नंदाखाल येथील मातीकाम करणारा शिवा, गुडविल सोनार ह्यासारख्या लोकांनी अधिक व्याजाचे आमिष दाखवून कोट्यावधी रुपयाचा आपल्या वसईतील लोकांना चुना लावला आहे. त्यासाठी आर्थिक साक्षरता असणे आवश्यक आहे.

**सौ. लता फोस**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जीवन विकास पतपेढी





# महिलांचे आर्थिक सबलीकरण

'एवढ्या मोठ्या जगात, एक मूठभर जागा मिळेल का स्त्रीला'

पुरुषप्रधान समाजात स्त्रियांचा सन्मान, स्थान आणि अस्तित्वाबाबत अनेक प्रश्न आणि समस्या याबाबत आपल्या मनात विचार घुटमळत आहेत. पुरुषांच्या खाद्यांला खांदा लावून स्त्रिया नवनवीन क्षेत्र पादाक्रांत करत आहेत, स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याकरीता धडपडत आहेत, पण त्याचप्रमाणात समाजात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचार कमी झाले आहेत का, हाही प्रश्न तेवढाच महत्त्वाचा आहे. अनादी काळापासून महिलांवरील बंधने ही त्यांच्या वैयक्तिक आणि व्यवसायिक विकासाच्या आड येत आहेत.

'शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे आणि जो हे प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' हे बाबासाहेबांचे उद्गार. जीवनात प्रगती करण्याचे शिक्षण हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. महिलांची प्रगती आणि सक्षमीकरणासाठी शिक्षणापेक्षा जास्त परिणामकारक दुसरी गोष्ट असूच शकत नाही, परंतु समाजातील दुय्यम स्थान आणि बंधने यामुळे स्त्रियांना अर्धवट शिक्षण मिळते. पण सरकारच्या हजेरी भत्ता आणि आहार वाटपामुळे मुलींचा पट वाढला असून शिक्षणाद्वारे देशातील कानाकोपऱ्यातील ग्रामीण मुली व महिलांना समान दर्जाने सक्षम बनविले आहे. स्त्री सक्षमीकरणाच्या विविध कार्यक्रमातून स्त्री-पुरुष समानता, समान हक्क त्याचबरोबर निर्णय प्रक्रियेत समानता मिळायला हवी. जर देशाचा निम्मा हिस्सा असलेल्या महिला जर विकासांपासून वंचित राहतील तर समाजाचा किंबहुना देशाचा विकास होऊच शकत नाही, म्हणूनच शासनाने महिला सबलीकरणांकरीता १९९१ साली धोरणात्मक योजना व २००९ साली सुधारीत योजना राबविल्या. बचत गटासारख्या योजनेमधून महिलांच्या आर्थिक सबलीकरणाकडे विशेष लक्ष दिले गेले. SGSY योजनेद्वारे उद्योगधंद्याकरीता ५०% सबसिडी देऊ केली. स्त्री भ्रूणहत्या रोखण्याकरीता सुकन्या समृद्ध योजना, माझी कन्या भाग्यश्री, तर बेटी बचाओ बेटी पढओ अभियान किशोरवयीन मुलींकरीता सबला योजना, प्रियदर्शनी योजना,



वर्कींग व्युमन वस्तीगृह योजना, किशोरी शक्ती योजना, महिलांच्या व्यवसायांना उन्नतीकडे नेण्याकरीता महिला ई हाट, स्वधार गृह योजना तसेच महिला किसान सशक्तीकरण योजना त्याचप्रमाणे विधवा व निराधार महिलांना आर्थिक सहाय्य तसेच मुलांच्या शिक्षणांकरीता व मुलींच्या लग्नांकरीता आर्थिक सहाय्य देऊन आर्थिक सबलीकरण करण्याचा प्रयत्न आहे. तरीही त्याचा वेग फारच कमी आहे. महिला या उपजीविकेकरीता शेती, मजुरी, दुग्ध व्यवसाय या क्षेत्रात काम करीत असतात. परंतु त्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही, त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही.

म्हणूनच महिलांच्या दृष्टीने कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय किंबहूना सर्वच क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा, विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण म्हणता येईल.

खांद्यावर घेऊन आकाश अर्ध
चला जाऊया पुढे
नवशतकाच्या पाठीवरती बिंबवू समानतेचे धडे.

**रेश्मा शेख**
सख्यांची TOT सदस्या, विरार



# स्त्रिया व आर्थिक सक्षमीकरण

"दाम करी काम, दुनिया करी सलाम" ही म्हण आपणास माहितच आहे. रोजच्या व्यवहारात सर्व सोंग आणता येतात पण पैशाचे सोंग आणता येत नाही. जीवनात पैसा सर्वस्व नाही परंतु जीवन जगताना पैशाची गरज अनिवार्य आहे. पैशाशिवाय संसाराचा गाडा चालवता येत नाही. श्रीमंत असणं वाईट नाही, परंतु ती श्रीमंती वाममार्गाने मिळवलेली नसावी .

२१ व्या शतकातील आधुनिक युगात कुटुंबाच्या अपेक्षा व गरजा वाढल्या आहेत. महागाई वाढली आहे. अशावेळी स्त्रियांनी सुद्धा आर्थिकदृष्ट्या सक्षम होणं काळाची गरज आहे. असं म्हटलं जातं. एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होते. त्याप्रमाणे स्त्री आर्थिक नियोजन उत्तम करते. म्हणूनच स्त्रीला घराची अर्थमंत्री संबोधले जाते.

स्त्रियांना सर्वांगीण व आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्त्री शिक्षणाची गरज आहे. शिक्षणामुळे स्त्रिया स्वावलंबी बनून आत्मविश्वासाने व स्वाभिमानाने जीवन जगू शकतात. शिक्षणामुळे स्त्रिया सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करतात त्या आर्थिक क्षेत्रात पण मागे नाहीत. याचे उदाहरण म्हणजे १३० कोटी लोकसंख्या असलेल्या भारताच्या अर्थमंत्री निर्मला सितारामन् देशाचा आर्थिक व्यवहार पहात आहेत.

भारत हा विकसनशील देश आहे. या देशात ३०/३५ टक्के लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहेत. या दारिद्र्य रेषेखालील स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणांकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. या स्त्रियांची स्थिती फार दयनीय आहे यामध्ये अनेक गटातील स्त्रिया येतात. विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत, पौढ कुमारीका, व्यसनी नवऱ्यांच्या बायका, मोलमजूरी, धुणीभांडी, कचरा वेचणाऱ्या, तळागाळातील काबाडकष्ट करणाऱ्या, अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या बायका, शेतीवर वेठबिगार म्हणून काम करणाऱ्या, विटभट्टीवर काम करणाऱ्या, ऊस तोडणी करणाऱ्या स्त्रिया या सर्वांचा समावेश होतो. या सर्व आर्थिक दृष्ट्या सक्षम नाहीत. या स्त्रियांचे जीवनमान उंचावण्यासाठी, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी सरकारने अनेक योजना राबवल्या आहेत. पण त्याची नीट अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. अंमलबजावणी नीट होत नसल्यामुळे त्याचा फायदा किती जणांना होतो हा वादाचा मुद्दा आहे.

**काही सरकारी योजना व उपक्रम**

★ स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात स्त्रियांच्या अल्पबचत गटाची कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. या गटामार्फत निरनिराळे उद्योग व व्यवसाय राबवले जात आहे. अनेक स्त्रिया त्याचा लाभ घेत आहेत.



★ सरकारी आर्थिक विकास मंडळाकडून छोट्या मोठ्या व्यवसायासाठी बिनव्याजी कर्ज मिळू शकते.

★ निराधार स्त्रियांसाठी संजय गांधी निराधार योजना .

★ मुलींच्या शिक्षणासाठी असलेल्या योजना उदा. निरनिराळ्या शिष्यवृत्या, हजेरी भत्ता.

स्त्रियांनी आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी ज्यांना नोकरी करता येणे शक्य नाही त्यांनी लहान मोठा उद्योग केला तर त्या आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊ शकतात. स्वत: एकटीने किंवा काही महिलांना एकत्र करून खालील व्यवसाय करता येतात.

★ पशुपालन व दुधापासून निरनिराळे पदार्थ बनविणे .

★ कुक्कुट पालन, गावरान कोंबडी पालन, कडक नाथ कोंबडी पालन (लेअर (अंडी देणाऱ्या कोंबड्या) कोबंडी पालन)

★ शेळी पालन, गांडूळ खत, कंपोस्ट खत तयार करणे.

★ परस बागेतील सेंद्रीय भाजीपाला, फुलबाग शेती, फळांपासून जाम तयार करणे.

★ निरनिराळे मसाले, पीठ दळून पॅकींग करून विकणे.

★ फरसाण तयार करणे, पापड, कुरड्या, चकल्या, केक, नाताळ, दिवाळी, फराळ इत्यादी तयार करणे

★ छोट्या खानावली, शाळा, कॉलेज, दवाखाने या ठिकाणी कॅटींन चालविणे

★ भाजी धुवून साफ करून चिरून पॅकींग करून विकणे उदा. (वटाणे सोलणे, लसूण सोलणे)

★ शिवण काम, भरतकाम, पेंटिग, मोत्याचे दागिने तसेच नकली दागिने, फुले बनविणे, बाहुल्या बनवणे कापडी पिशव्या, पर्स, बॅगा बनविणे अशा प्रकारे इच्छा व आवड असेल तर सवड आपोआप निघू शकते. पण यासाठी योग्य ते मार्गदर्शन आवश्यक आहे.

**श्रीम. मदल्यान व्हिक्टर नुनीस**

**सख्याची TOT सदस्या, गिरीज**

# Women's Economic Empowerment :

My name is Mahée Villemure. I am a 2nd year Bachelor of Social Work student at HES-SO in Switzerland. I had the opportunity to go abroad to do an internship for about 4 months, that's why I'm doing this internship in the Sakhya Women's Guidance Cell organization.

In my opinion, access to economic empowerment is improving for women in Switzerland. Most women are no longer afraid to claim their rights. The Swiss woman is on the path to emancipation. Most women want a professional career and fight to achieve their goal and become financially independent, this allows them to manage their own needs and have power over them. However, there are still many obstacles to acquiring a position of responsibility as a woman. Gender discrimination is still too present. The woman must always prove what she is worth to break sexist prejudices in order to be accepted. In addition, the wage gap between men and women still exists, especially for so-called "Highly Responsible" posts. In short, today's woman still faces inequalities but is ready to fight for her rights to the end. I think that men and women must come together against sexism to change mentalities for the next generation. So many people have already fought for women's rights many years ago, thanks to them I have the right to vote, to study, to have an abortion and more. Now it is my generation's turn to continue the fight to stop this sexism.

Since I have been in India, I have noticed that for many Indian women it is rather difficult to dare to fight for their rights and to be heard. I have the impression that there is such social pressure due to the very strong culture in society. Women are rarely seen as individuals in their own right, but as members of the family or community. Most are also dependent on their fathers, after their husbands' marriages, and then on their sons. Throughout her life she is dependent on a male person.



Moreover, according to my observations, very few women, especially from marginalized communities, are economically independent. Since in most cases and according to society's expectations, it is the man who brings the money home. Women therefore often have no power over this, as they are often not part of the decision-making process. I really have the impression that patriarchy is very, very strong in India compared to Switzerland. But the situation of women in India is so complex that it cannot be summed up in that way because there are so many factors at play, such as caste, social class, education, religion and more.

Finally, no matter where you come from, gender inequality is a subject that should be discussed as often as possible to create the debate that I believe will lead to awareness and changes towards women's emancipation. I keep an optimistic look towards the future for women!

**Mahée Villemure**

**Student from Hesso College, Switzerland**

## ''घुटन''



पता नही कुछ घूट रहा है,

बाहर आने के लिए,

घूट रहा है, कुछ बताने के लिए

घूट रहा है, कुछ कर जाने के लिए,

घुट रहा है, अपनों को अपनाने के लिए,

घुट रहा है, समाज की बुराईयों को हटाने के लिए,

घुट रहा है, नई क्रांती लाने के लिए,

घूट रहा है, अपने सपनों, आशाओं को पाने के लिए

घुट रहा है, नई दुनियॉ सजाने के लिए

**- रेश्मा शेख**

# त्रैमासिक अहवाल

## वस्ती पातळीवरील कार्य

१) **<u>बेटी बचाओ अभियान :</u>** निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशलवर्कच्या विद्यार्थ्यांमार्फत सुळेश्वरपाडा, गास डोंगरी, भदाणेपाडा आणि गौतम नगर येथील महिला, युवक व मुलांसोबत खेळ, भाष्य, चित्रफीत प्रदर्शन, रॅली, रांगोळी स्पर्धा व विविध गटकार्य, चित्रकला स्पर्धा यांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने जनजागृती करण्यात आली.



२) **<u>दिवाळी मेळावा :</u>** वस्ती पातळीवरील महिलांकरीता दिवाळी मेळावा आयोजित करण्यात आला. विविध खेळ, रांगोळी स्पर्धा व मौजमजेसह दिवाळी साजरी करण्यात आली. तसेच भदाणेपाडा व गास डोंगरीतील मुलांकरीताही विविध खेळांचे आयोजन वस्ती पातळीवर करण्यात आले.




३) गणेशोत्सवाच्या निमित्ताने ठाणे, मांडवी व भदाणेपाडा येथे पथनाट्य, खेळ व भाष्य यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.



## प्रशिक्षण कार्यक्रम

❖ **सुजान पालकत्व**

सेंट पिटर हायस्कूल, विरार येथे पालकाकरीता सुजान पालकत्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.



❖ **मूल्यशिक्षण :**

Infant Jesus School, नालासोपारा येथे विद्यार्थ्यांना मुल्य शिक्षणाबाबत मार्गदशन केले.

❖ सेंट जेम्स चर्च, आगाशी येथे महिलासोबत आरोग्य या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

❖ नानभाट चर्चमध्ये कुटुंब आणि नातेसंबंध याविषयांवर महिलां गटासोबत प्रशिक्षण घेण्यात आले.

❖ कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारी लैंगिक हिंसा प्रतिबंध व उपाय अधिनियम २०१३ आणि लिंगभाव याविषयावर St.

Xavier's Institute च्या B. Ed महिला विकास केंद्रच्या गटासोबत प्रशिक्षण कार्यक्रम राबविला.

❖ **घरगुती हिंसा व पोलिसांची भूमिका : -**

या विषयांवर अर्नाळा, वसई व वालीव पोलिस स्टेशनमधील कर्मचारी वर्गासोबत घरगुती हिंसा म्हणजे काय त्यांचे प्रकार, कायदेशीर तरतूद यासंबंधी मार्गदर्शन करून घरगुती हिंसाचाराच्या गटामध्ये पोलिसांची भूमिका यासंबंधी प्रशिक्षण घेण्यात आले.




❖ **चांगला स्पर्श व वाईट स्पर्श :-**

❖ भुईगाव धर्मप्रांतातील मुलांच्या गटासोबत 'चांगला स्पर्श व वाईट स्पर्श' ह्या विषयांवर तर मुलींच्या गटासोबत बाल लैंगिक शोषण ह्या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

❖ जिल्हा सामान्य रूग्णालय, ठाणे येथील हाऊसकीपिंग स्टॉफ सोबत महिलांचे आरोग्य ह्याविषयी चर्चासत्र घेण्यात आले.



❖ जिल्हा परिषद शाळा, भोयदा पाडा व गोखिवरे येथील विद्यार्थ्यांना 'चांगला स्पर्श वाईट स्पर्श' तसेच गट बांधणी ह्या विषयांवर कार्यशाळा घेण्यात आली.

## लिंगभाव संचेतना

होली क्रॉस स्कूल, निर्मळच्या इंग्रजी माध्यमच्या विद्यार्थ्यांसोबत Hesso School of Social Work University च्या सख्यात अभ्यासाकरीता असलेल्या विद्यार्थीनीने चर्चासत्र घेतले. ज्यात PPT सादरीकरण, चित्रफीती, गटकार्याच्या माध्यमातून दोन्ही देशांच्या लिंगभाव व लिंगभेदाच्या फरकाचे विश्लेषण अभ्यासांद्वारे स्पष्ट केले.



## महिला सक्षमिकरण प्रशिक्षण कार्यक्रम :

मांडवी तसेच ठाण्यातील मनोरमा नगर मधील नेतृत्व गुण असलेल्या महिलांकरीता राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात गटबांधणी, संविधानिक मूल्य, महिलांसंबधी NC, FIR कायदे पोलिस स्टेशन संदर्भातील महिलांचे अधिकार तसेच कामाच्या ठिकाणी महिलांची होणारी लैंगिक हिंसा प्रतिबंधक अधिनियम याबाबत कार्यशाळा राबविण्यात आली



## आरोग्य शिबीर :

कार्डिनल ग्रेशिअस हॉस्पिटल, बंगली नाका व सख्या संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने करजोण ह्या वसई तालुक्यातील दुर्गम भागत चैतन्य संस्थेच्या मदतीने आरोग्य शिबिर आयोजित करून औषधांचे वाटप करण्यात आले.

## अंतर्गत तक्रार निवारण समिती :

Manoj Internation Expo कंपनीतील अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या कर्मचाऱ्यांसोबत जेंडर पॉलिसी नुसार पितृत्त्व

रजा ह्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

❖ India fashion Pvt. Ltd. आणि Miles Education ह्या संस्थेच्या अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रथम बैठकीत कामाच्या ठिकाणी महिलांची होणारी हिंसा -प्रतिबंध अधिनियम २०१३ नुसार समितीची भूमिका स्पष्ट करण्यात आली.




❖ ज्ञानमाता सदन सोसायटी, तलासरी येथे अंतर्गत तक्रार निवारण समितीची बैठक घेऊन संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांकरीता कामाच्या ठिकाणी महिलांची होणारी लैंगिक हिंसा प्रतिबंध अधिनियम २०१३ ह्या विषयांवर कार्यशाळा घेण्यात आली.

❖ रिझर्व बँक ऑफ इंडिया येथे अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या सदस्यांसोबत बैठक घेतली. तसेच सर्व कर्मचाऱ्यांसोबत कार्यशाळा घेण्यात आली.

❖ सेंट जोसेफ कॉलेज सत्पाळा ICC मिटींग घेण्यात आली.

## कर्मचारी क्षमता वृद्धी :

⊶ गोरेगांव, सेंट पायस येथे क्रेडिट सोसायची व Micro finance याबाबत कार्यशाळेत सख्यचा सहभाग संस्थेच्या कार्यशाळेत सख्याचा सहभाग.

⊶ MAVA संस्थेच्या कार्यशाळेत सख्याचा सहभाग.

## अभ्यास दौरा

मनोरमा नगर ठाणे, येथील नेतृत्त्व गुण असलेल्या महिलांचा संरक्षण अधिकारी कार्यालय, ठाणे येथे अभ्यासदौरा नेण्यात आला.

## मान्यवरांची भेट

⊶ Manos Unidas ह्या स्पेनच्या Organizer ची संस्थेला भेट.

Hesso School of Social Work, University Switzerland च्या विद्यार्थ्यांची सख्यला भेट तसेच तीन महिन्याच्या कालावधी करीता इंटनशीप.




⊶ NGO MEET :-

वसई व मुंबई मधील १५ सामाजिक संस्थाची We Action च्या बॅनरखाली 'सख्य' संस्थेच्या पुढाकाराने/निर्मळ येथे कार्यशाळा घेण्यात आली. ज्यामध्ये मजलीसच्या ॲड. नौशीन यांनी घरगुती हिंसा प्रतिबंध कायदा २००५ बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच स्त्रीमुक्तींच्या श्रीमती शोभा यांनी सेवाभावी संस्थेच्या अनुषंगाने घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५च्या योग्य अमंलबजावणीसाठी येणाऱ्या अडचणी यांवर मार्गदर्शन केले.



⊶ Rise -up प्रकल्पाच्या माध्यमातून घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा २००५ च्या योग्य अमंलबजावणीकरीता वसई तहसीलदारांसोबत बैठक.

⊶ घरगुती कामगार च्या मेळाव्यात सख्यचा सहभाग.

⊶ Chari च्या बैठकीत सख्यचा सहभाग.

⊶ CSR च्या Exhibition Event मध्ये सख्य सहभाग.

# महिलांच्या आर्थिक विकासाची वाटचाल आणि आव्हाने

जागतिक आर्थिक फोरम २०१८ च्या अहवालात लिंग-समानतेच्या प्रकिये (gender equality) मुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये चांगली प्रगती झाली आहे असं म्हटलं आहे. यासाठी भारतामध्ये अनेक समाजसुधारकापासून तर स्त्री वादी चळवळी, लिंगभाव विषयक दृष्टीकोनातून विचार करणारे अर्थतज्ज्ञ, विविधगट, महिलांसाठी कार्यरत संस्था यांच्या सततच्या प्रयत्नांनी वित्त मंत्रालयाने व सर्व मंत्रालयांना लिंगभावानुसार अर्थसंकल्प विषय केंद्र संकल्प (Performance budget) सादर करण्यास सांगितले.

भारताने महिला विकासाच्या धोरणाचा अवलंब करून यासंबंधी प्रयत्न सुरू केले होते. २००५ च्या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करताना प्रा. वि. पटेल म्हणाले, 'राष्ट्रीय अर्थसंकल्प स्त्रियांप्रति संवेदनशील असणे हे चांगल्या आर्थिक दृष्टीकोनाचे द्योतक आहे. त्यामुळे सरकारी कार्यक्रम हे स्त्रियांसाठी राबविल्या जाणाऱ्या विशिष्ट कार्यक्रमांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिक प्रभावी ठरतील आणि यापूर्वीच्या धोरणामुळे निर्माण झालेल्या असमान परिणामाचा प्रभाव कमी करण्यासाठी सहाय्यभूत होतील.

दहाव्या पंच वार्षिक योजनेत ही भूमिका स्पष्ट मांडली होती. "विकासाचे मापन" करताना केवळ मिश्र देशी उत्पत्तीचाच विचार न करत त्यापलीकडे जाऊन ग्रामीण व शहरी भागांमध्ये पिळवणूक होते त्या गोष्टी समजून घेऊन मानवी विकासाचे मापन करण्यासाठी लिंगभावानुसार विकासाचे निर्देशांक तातडीने करण्याकडे लक्ष दिले. त्यानंतर विचारसरणी सरकारच्या कार्यातून पुढे आणण्यात आली. याची प्रचिती आपल्याला काही प्रमाणात भारतामध्ये काही ठिकाणी कमी-अधिक प्रमाणात दिसून येते. महिलांनी समाजाचे, शासनाचे, धर्माचे, संस्कृतीचे, पितृसत्तेचे वर्ण व्यवस्थेचे जाळे समजून घेऊन स्वत:ला मुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. आज काही विभागात दीडशे दोनशे महिला ग्राम सभेत जाऊन आपले प्रश्न मांडत आहेत. बचत गटाच्या सहाय्याने निर्णय प्रक्रियेत सहभागी होत आहेत. आपल्या प्रश्नांसाठी लढण्याची ताकद काही महिला नेतृत्वानी तयार केली आहे. तसेच महिला व्यावसायिक क्षेत्रात आत्मविश्वासाने आणि कुशलतेने नेतृत्व करताना दिसत आहेत. मग त्या वायू सेनेतील 'प्लाइंग ऑफिसर अवनी चतुर्वेदी असो की टॉप- २५ मधील ट्रॅक्टर CED मलिका श्री निवासन की चंद्रा कोचर MD, ICICI Bank या सर्व महिला आणि अशा किती तरी महिलांचा आपणाला अभिमान वाटतो.



मात्र २०१८ च्या ग्लोबल जेंडर गॅप इन्डेक्स मध्ये असे दिसून आले की एकूणच महिलांनी ६८% समानता गाठली आहे. या अहवालात चार मुख्य क्षेत्रामधील लैंगिक अंतर मोजले गेले आहे. १) आर्थिक सहभाग आणि संधी २) शैक्षणिक प्रगती ३) आरोग्य आणि अस्तित्व ४) राजकीय सबलीकरण या अहवालानुसार १४९ देशामध्ये भारत हा १४२ क्रमांकावर आहे. याविषयी चिंतन करताना लक्षात आले की शैक्षणिक आणि काही प्रमाणात आर्थिक सबलीकरण झाले असले तरी ५०% आरक्षणाचं बील अजून ही संसदेत धुळ खात आहे. तर संस्कृती, रूढी, परंपरा यांच्या नावाखाली आरोग्य आणि अस्तित्वाची लढाई आजही लढावी लागते.

महिलांच्या हक्काचा सर्वात महत्त्वाचा आर्थिक परिणाम म्हणजे श्रमशक्तीचा सहभाग वाढविणे. स्त्रिया मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडून पुरुषांच्या बरोबरीने आपल्या कलागुणांचा आणि श्रमाचा वापर आर्थिक विकास वाढवण्यात घालवत असले तरी देखील त्याचे कौशल्य काही वेळेला वापरले जात नाही. कारण व्यावसायिक महिलेवर असलेली घरातील जबाबदारी हे एक मोठं आव्हान आहे. ह्या विषयीचे स्पष्टीकरण पेप्सीको कंपनीच्या CEO इंद्रा नोयी यांच्या आईने परखडपणे सांगितले आहे. "तू पेप्सीकोची अध्यक्ष म्हणून व्यावसायिक पेशा मध्ये असशील पण घरात तू पत्नी, आई, सून, मुलगी ह्या सर्व भूमिका आहेत. ती जागा कोणीही घेऊ शकत नाही. तर 'आगाम वालीया' ह्या तरुण उद्योजिकेत तिच्यासमोर असलेल्या आव्हानाविषयी त्या म्हणाल्या, पुरुषांना स्वयंपाक करणे, घर सांभाळणे यासारख्या मूलभूत कौशल्य नसल्यामुळे बाईला तारेवरची कसरत करावी लागते.

हीच परिस्थिती कुटुंबाची आर्थिक परिस्थितीला हातभार लावणाऱ्या तमाम महिला वर्गाची जी मुलांचे आजार आरोग्यापासून शिक्षण आणि नीतीमूल्य जपण्याची कसरत करत आहे.

वरील गोष्टीचा उहापोह करताना महिला प्रगती पथावर आहेत याची प्रचिती येते. मात्र महिलांची आणि पुरुषांची कुटुंबासंबंधातली जबाबदारी, समाजाचा यासंदर्भातील दृष्टीकोन बदलत्या सामाजिक परिस्थितीबरोबर बदलणे ही काळाची गरज आहे. हे एक आव्हान आहे.

**नॅटी लोपीस-उपसंचालिका, सख्य**

# MOST PROMISING COMPANY OF THE YEAR!

# RBL BANK




## CNBC TV18 India Business Leader Awards - 2018

### Some Of Our Important Accolades

**CNBC ASIA — INDIA TALENT MANAGEMENT AWARD**
India Talent Management Award from CNBC Asia **(2017)**

**EY Entrepreneur Of The Year — ENTREPRENEUR OF THE YEAR AWARD**
Vishwavir Ahuja recognized as 'EY Entrepreneur of the Year' in the Financial Services Category **(2016)**

**WORLD ECONOMIC FORUM — GLOBAL GROWTH COMPANY AWARD**
Recognized by World Economic Forum as a 'Global Growth Company' **(2014)**

**Business Today — BEST SMALL BANK AWARD**
Business Today-KPMG Study Best Bank-Growth 2012-16 Best Small Bank 2017 **(2012 to 2017)**

**BW BUSINESSWORLD — FASTEST GROWING SMALL BANK AWARD**
Business World Study India's Fastest Growing Small Bank **(2013 to 2017)**

RBL Bank is almost 75 year old, but only 7 years young in our current avatar. During this period, the bank has grown by almost 40 times in size and over 50 times in profits. We have put together a best in class institution to deliver best in class banking services, grounded on the principles of strong governance, best professional standards and an ethical value system. We are overwhelmed by the support and good wishes from all our stakeholders.

**Thank You!**

*apno ka bank* | RBL BANK

**Call:** 1800 123 8040 | **Visit:** www.rblbank.com | **Write:** customercare@rblbank.com
**CIN** L65191PN1943PLC007308

9765874493